International Research Journal ISSN-0975-3486 VOL. I * ISSUE—5 RNI : RAJBIL/2009/30097

शोध पत्र-भूगोल

Feb, 2010

# उदगीर शहरातील मुस्लिम लोक संख्या वितरणाचा भौगोलिक अभ्यास

* डॉ. एच. बी. राठोड ** डॉ. बी.एन. नागलगावे
*** प्रा. जे एफ. आतार

*भूगोल विभाग प्रमुख श्री हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर
** भूगोल विभाग प्रमुख पं. दीनदयाल उपाध्याय महाविद्यालय देवणी
*** अधिव्याख्याता, जमहूर उर्दू डी.एड. कॉलेज, उदगीर

**1.1 प्रस्तावना :**

लोकसंख्येच्या विश्लेषणात्मक अभ्यासात लोकसंख्या वितरणाच्या अभ्यासाला अन्यन्यासाधारण महत्व आहे. कोणत्याही प्रदेशातील लोकसंख्येची वैशिष्टये त्या प्रदेशातील औद्योगिक, सामाजिक तसेच सांख्यिकीय घटकांवर अवलंबून असते. तसेच या घटकांचा आणि लोकसंख्या वितरणाचा अगदी जवळचा संबंध असतो. मानवी संख्येची पृथ्वीवरील क्षेत्रीय वाटणी म्हणजेच लोकसंख्या वितरण होय. तर विशिष्ट एकक क्षेत्रात किती लोकसंख्या सामावली आहे याचे गुणोत्तर म्हणजे लोकसंख्येची घनता होय. अर्थात लोकसंख्या घनता हे लोकसंख्या अभ्यासात वापरले जाणारे हे अगथी सोपे परिमान आहे. लोकसंख्येच्या अभ्यासात वितरणाचे भौगोलिक विश्लेषण अभ्यासणे महत्त्वाचे आहे.

**1.2 अभ्यास क्षेत्र :** उदगीर हे लातूर जिल्हयातील तालुक्याचे ठिकाण आहे. उदगीर शहर हे बालाघाट पर्वत रांगेमध्ये वसलेले असून हे उंचीवरील ठिकाण आहे. उदगीर नगराचा विकास नरंतर होत आहे. उदगीर तालुका 17$^0$52ङ आणि 18$^0$50ङ उत्तर आणि 76$^0$12ङ व 77$^0$18ङ पूर्व दरम्यान वसलेले आहे. समूद्र सपाटीपासून उदगीर शहराची उंची 632 मी. इतकी आहे. उदगीर या भौगोलिक विस्तार 762.6 टक्के हेक्टर इतका असून उदगीर नगराचा अक्षवृत्तीय विस्तार 18$^0$24ङ उत्तर रेखावृत्तीय विस्तार 77$^0$7ङ पूर्व उदगीर नगराचा विस्तार पूर्वेकडे, पश्चिमेकडे, दक्षिणेकडे जास्त प्रमाणात होत आहे. याउलट उत्तर व ईशान्येकडे विस्तार खंडीत झालेला आहे. याच्या उत्तरेला चाकूर आणि अहमदपूर तालुका आहे.

**1.3 अभ्यासाची उद्दिष्टये :** उदगीर शहरातील मुस्लिम लोकसंख्येचे प्रभागनिहाय लोकसंख्या वितरण अभ्यासणे.

**1.4 अभ्यास पध्दती :** प्रस्तुत शोधनिबंधात उदगीर शहरातील मुस्लिम लोकसंख्येचे भौगोलिक वितरण अभ्यासण्याकरिता प्राथमिक व द्वितीय स्वरुपाची माहिती मिळविली आहे. त्यासाठी प्रत्येक प्रभागातील कुटुंब प्रमुखास भेटून प्रश्नावली भरुन घेतली आहे. प्रश्नावलीच्या आधारे मिळालेल्या माहितीवरुन लोकसंख्येचे वितरण अभ्यासले आहे.

**1.5 उदगीर शहरातील प्रभागनिहाय मुस्लिम लोकसंख्या :**

उदगीर शहरातील मुस्लिम धर्माचे लोकसंख्या वितरण पाहण्यासाठी चार गट पाडण्यात आले व त्यामध्ये कमी, मध्यम, जास्त व अतिजास्त असलेले गट पाडण्यात आले ते खालील तक्त्यावरुन स्पष्ट होते.

वरील तक्त्यावरुन उदगीर शहरातील मुस्लिम लोकसंख्येचे वितरण खालीलप्रमाणे स्पष्ट होते.

**1. कमी लोकसंख्या :** या गटामध्ये उदगीर शहरातील मुस्लिम धर्माची सर्वात कमी लोकसंख्या असलेल्या प्रभागाचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये आनंद नगर, धनगर सोसायटी, यशवंत सोसायटी, रोहिदास सोसायटी, शास्त्री कॉलनी, समता नगर, राम मंदिर, विकास नगर कॉलनी, गोपाळ नगर या प्रभागाचा समावेश होतो. या गटात 411 पेक्षा कमी लोकसंख्येचा समावेश होतो. या गटात एकूण 9 प्रभाग आहेत.

**2. मध्यम लोकसंख्या :** या गटात 416 ते 339 लोकसंख्या असलेल्या प्रभागाचा समावेश होतो. या गटातील प्रभागामध्ये संमिश्र कॉलनी, मलगे नगर, इंदिरा नगर, संत कबीर नगर, फुलार गल्ली, बागे हिसाम, खादी ग्रामोद्योग, मुसा नगर या प्रभागाचा समावेश होतो. या प्रभागातील कांही लोक आपला उदरनिर्वाह चालविण्यासाठी ग्रामीण भागातून आलेले आहेत.

**3. जास्त लोकसंख्या :** या गटात 753 ते 1423 मुस्लिम लोकसंख्या असलेल्या प्रभागाचा समावेश करण्यात आला आहे. यात पारकट्टी गल्ली, आझाद नगर, गांधी नगर, राम नगर, फुले नगर, गवळी गल्ली, किल्ला गल्ली, कमळी मठ या प्रभागाचा

समावेश होतो.

**4. अति जास्त लोकसंख्या :** या गटातील लोकसंख्या 1434 पेक्षा जास्त आढळून आली आहे. या गटातील प्रभागामध्ये गुंडेबाग, दबीरपूरा, गंगा नगर, शेटकार गल्ली, राज महंमद दर्गा रोड, संजय नगर, महाजन गल्ली, खानखाँ गल्ली या आठ प्रभागाचा समावेश होतो. या गटाच्या प्रभागातील लोकसंख्या ही अति जास्त स्वरुपाची आढळून आली. यामध्ये खानखाँ गल्ली या प्रभागाची लोकसंख्या ही सर्वोच्च असून ती 3429 इतकी आढळून आली आहे. या गटातील प्रभागामध्ये मुस्लिम धर्मात साक्षरतेचे प्रमाण हे कमी आढळून आले. त्याचबरोबर या गटातील काही प्रभागात शासकीय व खाजगी नौकरी करणाऱ्याचे प्रमाण कमी आढळले आहे.

**उदगीर शहरातील मुस्लीम धर्माची चढत्या क्रमानूसार प्रभागनिहाय लोकसंख्या**

| अ.क्र. | प्रभागाचे नाव | प्रभाग क्र. | प्रभागातील मुस्लिम लोकसंख्या | मुस्लीम मतदार |
|---|---|---|---|---|
| 1 | आनंद नगर | 22 | 41 | 17 |
| 2 | धनगर सोसायटी | 7 | 48 | 28 |
| 3 | रोहिथस सोसायटी | 21 | 126 | 57 |
| 4 | शास्त्री कॉलनी | 30 | 178 | 71 |
| 5 | यशवंत सोसायटी | 28 | 309 | 101 |
| 6 | समता नगर | 27 | 341 | 170 |
| 7 | राम मंदिर | 29 | 357 | 200 |
| 8 | विकास नगर कॉलनी | 33 | 376 | 170 |
| 9 | गोपाळ नगर | 26 | 411 | 217 |
| 10 | संमिश्र कॉलनी | 32 | 426 | 142 |
| 11 | मलगे गल्ली | 17 | 427 | 137 |
| 12 | इंदिरा नगर | 23 | 450 | 150 |
| 13 | संत कबीर नगर | 25 | 461 | 224 |
| 14 | मुसा नगर | 9 | 555 | 275 |
| 15 | फुलार गल्ली | 4 | 702 | 426 |
| 16 | बागेहिसाम | 24 | 708 | 403 |
| 17 | खादी ग्रामोद्योग | 20 | 739 | 420 |
| 18 | पारकट्टी गल्ली | 12 | 753 | 305 |
| 19 | आझाद नगर | 3 | 869 | 363 |
| 20 | गांधी नगर | 11 | 889 | 480 |
| 21 | रामनगर श्याम कॉलनी | 31 | 895 | 529 |
| 22 | फुले नगर | 6 | 1009 | 508 |
| 23 | गवळी गल्ली | 16 | 1114 | 671 |
| 24 | किल्ला गल्ली | 1 | 1163 | 595 |
| 25 | कमळी मठ लोहार गल्ली | 15 | 1423 | 663 |
| 26 | गुंडे बाग राज म. दर्गा | 14 | 1334 | 620 |
| 27 | दबीरपूरा | 2 | 1460 | 801 |
| 28 | गंगा नगर | 10 | 1476 | 792 |
| 29 | शेटकार गल्ली | 5 | 1783 | 990 |
| 30 | राज महंमद दर्गा रोड | 19 | 2337 | 1230 |
| 31 | संजय नगर (दत्तनगर) | 8 | 2409 | 1100 |
| 32 | महाजन गल्ली | 13 | 2655 | 1190 |
| 33 | खानखाँ खडकाली | 18 | 3429 | 1929 |

**1.6 निष्कर्ष :** उदगीर शहरातील मुस्लिम समाजाच्या लोकसंख्या वितरणाचा अभ्यास केला असता खालील निष्कर्ष पुढे येतात. 1) उदगीर शहरातील एकुण लोकसंख्येच्या तसेच मुस्लिम जातीच्या लोकसंख्या वितरणावर जमीनीचा उंचसखलपणा, मृदेचा प्रकार, जंगल इ. प्राकृतिक घटकांचा तसेच आरोग्याच्या सुविधा, शैक्षणिक सुविधा यासारख्या सामाजिक घटकाचा व रोजगाराच्या संधी वाहतुक व दळणवळण साधनाचा विकास इ. आर्थिक घटकाचा प्रभाव पडला आहे त्यामुळे उध्गीर शहरात मुस्लिम लोकसंख्येचे वितरण प्रभागनिहाय असमान झालेले आढळून येते. 2) उदगीर शहरात नागरिकरण झालेल्या भागामध्ये म्हणजेच विकसित भागामध्ये लोकसंख्या अधिक प्रमाणात स्थायिक होत आहे. 3) उदगीर शहरात मुस्लिम धर्माच्या लोकांना ज्या प्रभागात अधिक रोजगार उपलब्ध होईल त्या प्रभागात लोक अधिक प्रमाणात स्थायिक झालेले आहेत. 4) उदगीर शहरात मुस्लिम धर्माच्या लोकसंख्येचे वितरण असमान झालेले दिसून येते. त्यामध्ये प्रभाग खानखाँ मध्ये 3429, महाजन गल्ली 2655, संजय नगर 2409, राज महंमद दर्गा रोड 2337, शेटकार गल्ली 1783 ही सर्वोच्च लोकसंख्या आहे. तर आनंद नगर 41, धनगर सोसायटी 48, रोहिथस सोसायटी 126, शास्त्री कॉलनी 178 या प्रभागातील मुस्लिम लोकसंख्या ही सर्वात कमी आहे. 5) उदगीर शहरातील मुस्लिम धर्मातील एकूण लोकसंख्येत स्त्री-पुरुष प्रमाणामध्ये तफावत असून दर हजार पुरुषामागे स्त्रियांचे प्रमाण कमी आहे. त्यात पारकट्टी गल्ली 788, महाजन गल्ली 857, कमळी मठ 857, तर धनगर सोसायटी, रोहिदास सोसायटी, आनंद नगर या प्रभागात दर हजार पुरुषामागे स्त्रियांचे प्रमाण पुरुषांपेक्षा जास्त आहे. 6) उदगीर शहरातील मुस्लिम धर्मातील एकूण लोकसंख्येत लिंगगुणोत्तर दर हे शहरी भागात जास्त तर मागासलेल्या प्रभागात कमी प्रमाणात आढळून आले आहे.

## सन्दर्भ ग्रन्थ

1. प्रा.आतार जमील फतरु (2009) : यांचा स्वामी रामानंद तीर्दा मराठवाडा विद्यापीठ नांदेड येदो सादर केलेला अप्रकाशित एम.फिल (भूगोल) लघुशोध प्रबंध ‘उदगीर शहरातील मुस्लिम समाजाच्या लोकसंख्येचा अभ्यास’ 2. डॉ.घोलप टी.एस. (1992) : लोकसंख्या भूगोल, निशिकांत प्रकाशन, पुणे. 3. डॉ.हिरालाल (1989) : जनसंख्या भूगोल, वसूंधरा प्रकाशन, पुणे. 4. सौ.कानेटकर व कूलकर्णी (1989) : लोकसंख्या भूगोल, निराली प्रकाशन,पुणे. 5. डॉ.वसंत व इतर (1992) लोकसंख्या भूगोल, मेहता पब्लिकेशन, पुणे. 6. आर्दिाक सामाजिक समालोचन, लातूर जिल्हा